

# अखंड हरिनाम सप्ताह आणि रामकथा २०२४

दि. ०७/०३/२०२४ ते १३/०३/२०२४



प्रति, ........................................

........................................

........................................

प्रेषक

**आमदार सुभाष देशमुख**

संस्थापक, लोकमंगल परिवार



ॐ



# अखंड हरिनाम सप्ताह आणि रामकथा २०२४

सर्व भाविकांना कळविण्यास आनंद होतो की, वडाळा पंचक्रोशीतील भाविकांच्या साहाय्याने लोकमंगल परिवारातर्फे भव्य दिव्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.
तरी आपण या भक्तिमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा ही विनंती.

**दि. ०७/०३/२०२४ ते १३/०३/२०२४**

## कार्यक्रमाची रूपरेषा

काकडा आरती : पहाटे ०४ ते ०६ । ज्ञानेश्वरी पारायण : सकाळी ०७ ते ११
भजन : सकाळी ११ ते दुपारी ०१ । रामकथा : दुपारी ०२ ते ०५
हरीपाठ : सायं. ०५ ते ०६ । हरी कीर्तन : रात्री ०८ ते १० । हरी जागर : रात्री १२ ते प. ०४

ह.भ.प.श्री. पुंडलिक महाराज मोरे
जगद्गुरु तुकोबाराय यांचे विद्यमान वंशज (देहू)
दि. ०७ मार्च २०२४

ह.भ.प.सौ. अंजलीताई केंद्रे
दि. ०८ मार्च २०२४

ह.भ.प.श्री. सचिन महाराज ढोले
दि. ०९ मार्च २०२४

रामकथा
ह.भ.प. श्री. अभिनंदन महाराज गायकवाड
लोकमंगल महाविद्यालय, वडाळा
दि. ०७ मार्च ते १२ मार्च २०२४



ह.भ.प.श्री. श्रावण महाराज जगताप
दि. १० मार्च २०२४

ह.भ.प.श्री. शिवानंद महाराज शास्त्री
दि. ११ मार्च २०२४

ह.भ.प.श्री. जगन्नाथ महाराज देशमुख
दि. १२ मार्च २०२४

ह.भ.प.श्री.अक्रूर महाराज साखरे
यांचे सकाळी १० ते १२ वा.
काल्याचे कीर्तन व महाप्रसाद -
दि. १३ मार्च २०२४
कीर्तन साथ - बाल वारकरी मंडळ,
लोकमंगल इंग्लिश मिडियम स्कूल, वडाळा

• आयोजक •

**लोकमंगल परिवार**

• स्थळ •

**लोकमंगल कॉलेजेस्, वडाळा**

तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर




## कीर्तन हे जगाच्या कल्याणाचे साधन

किर्तन हे जगाच्या कल्याणाचे पवित्र साधन असून कीर्तनामध्ये केलेले कवन, गायन, वादन यांचा उद्देशही जनकल्याण असला पाहिजे तसेच कीर्तनकाराने केलेल्या प्रत्येक विधानाचा प्रमाणाचा त्यांच्याकडे पुरावा असणे गरजेचे असल्याचे मत नाशिक येथील सुप्रसिध्द कीर्तनकार ह. भ.प.श्रावण महाराज जगताप यांनी व्यक्त केले.वडाळा येथील लोकमंगल समूह आयोजित लोकमंगल कॉलेजेस या ठिकाणी दि.७ मार्च ते १३ मार्च दरम्यान सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात चौथ्या दिवसाची कीर्तन सेवा सादर करताना ते बोलत होते. यामध्ये त्यांनी लोकमंगलच्या सामूहिक विवाह सोहळा, अन्नपूर्णा योजनासारख्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत यातून मा.आ. सुभाष बापू देशमुख यांचा सामाजिक जिव्हाळा दिसून येतो असे सांगितले. यावेळी लोकमंगल समूहाचे अध्यक्ष मा सुभाष बापू देशमुख, संस्थेचे अध्यक्ष मा. रोहन देशमुख, मा. मनिष देशमुख व कुटुंबातील सदस्य व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.





लोकमत



लोकमंगल महाविद्यालयाच्या प्रांगणात हरिनाम सप्ताहात कीर्तनसेवा सादर करताना हभप पुंडलिक महाराज मोरे.

# 'हरिनामाची जोड असणारी शिखर गाठतात'

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** कोणत्याही कार्याला हरी नामाची जोड असेल, तर ते काम शिखर गाठल्याशिवाय राहत नाही. आपली झोळी आशीर्वादाने भरावी, यासाठी आपणही काहीतरी देण्याची दानत ठेवली पाहिजे, असे आवाहन जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप पुंडलिक महाराज मोरे (देहू) यांनी दिला.

वडाळा येथे लोकमंगल कॉलेजेच्या प्रांगणात राम मंदिर परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात पहिली कीर्तन सेवा हभप मोरे महाराजांनी बजावली. सदा नाम घोष करू हरी कथा, तेने सदा चित्त समाधान, सर्व सुख ल्यालो सर्व अलंकार आनंद निर्भय डुल्लतसे, या संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगावर विश्लेषण केले. मानवतेच्या विश्व कल्याणकारी सुलभ असा मार्ग मनुष्याला संत तुकाराम महाराजांनी दाखविल्याचे या अभंगात दिसत असल्याचे मोरे महाराज म्हणाले.

सध्या सर्वच प्रकारच्या संस्थांचे व्यापारीकरण झाले असताना, काही अपवादात्मक संस्थामध्ये सुसंस्कार मिळत आहेत, त्यामध्ये लोकमंगल परिवार असल्याचे हभप पुंडलिक मोरे महाराजांनी सांगितले. लोकमंगल महाविद्यालय प्रांगणात कीर्तन महोत्सव ही चांगली बाब असल्याचे त्यांनी प्रमाण देत सांगितले. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांचा सपत्नीक सर्वश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराजांना परिधान करण्यात येणारी वस्त्रे देऊन सत्कार करण्यात आला.

Solapur Main
Page No. 8 Mar 09, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# घरातच सेवा करा; देव येतील : ढोले

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** संपत्तीपेक्षाही संस्कारक्षम



संतती महत्त्वाची आहे, आई-वडिलांना प्रसन्न ठेवा. घरातल्या दोन देवांची सेवा करा. मंदिरातील देव नक्कीच घरात येतील असे सांगत देशाने आपल्यावर प्रेम करावे असे वाटत असेल तर तोंड चांगले ठेवा, असा सल्ला छत्रपती संभाजीनगर येथील ह.भ.प. सचिन ढोले यांनी दिला.

वडाळा येथील लोकमंगल कॉलेजेस आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात तिसऱ्या कीर्तन सेवेत त्यांनी निष्ठा अन् प्रामाणिकता यावर प्रबोधन केले. मला अयोध्येत रामलल्लाच्या दरबारात कीर्तन करण्याची भावना होणार नाही, अशा लोकमंगलने बांधलेल्या सुंदर अशा राम मंदिरासमोर कीर्तन करता आल्याचे ते म्हणाले.

## निष्ठा अन् प्रतिष्ठा...

परमार्थाची पहिली पायरी निष्ठा आहे. आज सरपंच झालेला जमिनीवर राहत नाही मात्र एवढे मोठे वैभव असणारे आमदार सुभाष देशमुख यांच्यासारख्यांचे पाय जमिनीवर असल्याचे ह.भ.प. ढोले महाराजांनी सांगितले.

Solapur Main
Page No. 4 Mar 11, 2024
Powered by: erelego.com